# ठाणेमहानगरपालिका, ठाणे

महानगरपालेकाभवन, डॉ.अल्मेडारोड, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे-४००६०२.
दूरध्वनीः२५३३१२१९/२५३३१५९०

**वृत्तविशेष क्र : 099** **दिनांक : 26/03/2025**

## राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमात ठाणे महापालिकेचा राज्यात चौथा क्रमांक

## गतवर्षी होता आठवा क्रमांक

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमात राज्यातील महापालिका क्षेत्रात ठाणे महापालिकेचा चौथा क्रमांक आला आहे. गतवर्षी महापालिकेस आठवा क्रमांक मिळाला होता.

जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ या काळात क्षयरोग निर्मूलनासाठी करण्यात आलेले उपचार, रुग्णांची काळजी, औषधोपचारासाठी पाठपुरावा तसेच क्षयरोगाविषयी जनजागृती, स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून रुग्णांना केलेले सहाय्य आदी मुद्द्यांच्या आधारे गुणांकन करण्यात आले. त्यात, ठाणे महापालिकेस राज्यातील महापालिका गटात चौथा क्रमांक मिळाला आहे.

सन २०२४मध्ये ठाणे महापालिका क्षेत्रात ८१४३ नवीन रुग्णांची नोंद झाली. तर, ६९३६ रुग्णांनी निक्षय पोषण योजनेचा लाभ घेतला. एकूण ५७७२ रुग्णांचे क्षयरोगाचे उपचार पूर्ण झाले असून उर्वरित रुग्णांची उपचार प्रक्रिया सुरू आहे. क्षयरोग मोहिमेअंतर्गत ५ लाख ७७ हजार १९० संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली. ठाणे मध्यवर्ती कारागृह, मनोरुग्णालय, बांधकाम साईट, मॉल आदी ठिकाणी एक्सरे मशीन द्वारे कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली. तसेच, महापालिका क्षेत्रात घरोघरी तपासणी मोहिम राबवण्यात आल्याची माहिती महापालिकेचे शहर क्षयरोग अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांनी दिली.